
# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इमारत, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
फोन- + ९१-०२२-२६५९ ४०००, फॅक्स- + ९१-०२२-२६५९४१८२
ई-मेल - mmrcltd2010@gmail.com web: http://www.mmrdamumbai.org


## अधिसूचना

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मेट्रो लाईन-३ (कुलाबा-वांद्रे) विमानतळमार्गे सिप्झपर्यंत विस्तारित करून ३३.५ कि.मी. लांबीचा २७ स्थानके असलेला संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग विकसित करण्याचे ठरविले आहे. सदर प्रकल्पाच्या अर्थसहाय्यासाठी कर्ज उपलब्ध होण्यासंबंधी महाराष्ट्र शासनाची जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेबरोबर बोलणी सुरू आहेत.



कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो लाईन-३ छत्रमार्ग वर्ल्ड ट्रेड सेंटरजवळील कफ परेड येथे सुरू होऊन सिप्झ येथे संपतो. या मार्गावर चर्चगेट, छत्रपती शिवाजी टर्मिनस (सीएसटी), गिरगाव, महालक्ष्मी, वरळी, माहिम, वांद्रे (बीकेसी), आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय विमानतळ, एमआयडीसी आणि सिप्झ या महत्त्वाच्या ठिकाणी स्थानके आहेत. मेट्रो लाईन-३ छत्रमार्ग व त्यावरील स्थानकांची सविस्तर माहिती www.mmrdamumbai.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर प्रकल्प संरेखनाच्या आराखड्याची माहिती खालील कार्यालयांमध्येही उपलब्ध आहे.

१) परिवहन व दळणवळण विभाग, ८ वा मजला, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

२) उप संचालक (नगर नियोजन), बृहन्मुंबई, ईएनएसए हटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.

३) मुख्य अभियंता (विकास आराखडा), ४ था मजला, विस्तारित इमारत, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुख्य कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई- ४०० ००१.

४) जिल्हाधिकारी (शहर) मुंबई शहर कोषागार, ओल्ड कस्टम हाऊ, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

५) जिल्हाधिकारी (उपनगर), नवीन प्रशासकीय इमारत, वांद्रे कॉलनी, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार प्रकल्पामुळे पर्यावरण आणि समाजावर होणाऱ्या परिणामांच्या मूल्यमापनाचा अभ्यास हाती घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने मेट्रोचे संरेखन व स्थानकांची ठिकाणे याद्वारे अधिसूचित करण्यात येत असून याविषयी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यामार्फत संबंधित भागधारकांकडून लेखी सूचना/हरकती मागविण्यात येत आहेत.

यासंबंधी पुढील सविस्तर माहितीसाठी श्री. आर. रमणा, अतिरिक्त प्रमुख (परिवहन नियोजन), परिवहन व दळणवळण विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याशी वर नमूद केलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. लेखी सूचना व हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक ११ जानेवारी, २०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असेल.

प्रकल्पाची जनसुनावणी वरील दिनांकाच्या १ महिन्यानंतर आयोजित करण्यात येईल तसेच जनसुनावणीची तारीख, वेळ व ठिकाण वर्तमानपत्रातून जाहिरातीद्वारे प्रसिद्ध करण्यात येईल. वरील अधिसूचनेच्या संदर्भात ज्यांनी लेखी सूचना/ हरकती पाठविल्या असतील त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.


मुंबई
दिनांक : १२/१२/२०११

सही/-
(एस. व्ही. आर. श्रीनिवास भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक

# Mumbai Metro Rail Corporation Limited

MMRDA Building, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai– 400 051
**Phone: +91-022-2659 4000, Fax: +91-022-2659 4182,**
e-mail: **mmrcltd2010@gmail.com; web: http://www.mmrdamumbai.org**


## NOTIFICATION



Mumbai Metro Rail Corporation Ltd. intends to implement Metro Rail Line-3 (Colaba –Bandra) with an extension to SEEPZ via Airport as fully underground system of 33.5 km. and 27 stations. Government of Maharashtra is negotiating with Japan International Cooperation Agency (JICA) for a loan for this project.

The alignment starts from Cuffe Parade near the World Trade Centre junction and terminates at SEEPZ. Important station Locations on the alignment are Churchgate, Chattrapati Shivaji Terminus (CST), Girgaon, Mahalaxmi, Worli, Mahim, Bandra (BKC), Domestic & International Airport, MIDC and SEEPZ. Details of the alignment and station locations can be found at www.mmrdamumbai.org. The project alignment plan is also displayed at following offices:

i. Transport & Communications Divn. MMRDA, Bldg., Bandra-Kurla Complex, Bandra (E), Mumbai – 400 051
ii. Dy. Director (Town Planning), Greater Mumbai ENSA Hutment, E. Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai- 400 001
iii. Chief Engineer (Development Plan), 4th floor, Annexe building, MCGM head office, Mahapalika Marg, Mumbai -400 001
iv. Collector (City), Mumbai City Collectorate, Old Custom House, Fort, Mumbai - 400 001,
v. Collector (Suburbs), New Administrative Bldg., Bandra Colony, Bandra (East), Mumbai - 400 051

A Social and Environmental Impact Assessment Study is being undertaken as per JICA guidelines. In this regard the alignment and station locations are hereby notified and suggestions / objections for the same are invited from concerned stakeholders in writing by Mumbai Metro Rail Corporation Ltd.

For further details contact Shri. R. Ramana, Additional Chief (Transport Planning), Transport & Communications Divn., MMRDA at above mentioned Address. **Last date of submission of written suggestions/objections is 11th January, 2012 till 15.00 hrs.**

Public hearing regarding the project will be held one month thereafter. Date, time and place of public hearing will be notified through Newspaper Advertisement. Please note that no written communication will be sent to applicants filing suggestion / objections.

**Mumbai**
**Date: 12/12/2011**

Sd/-
**(S. V. R. Srinivas I.A.S.)**
**Managing Director**